# <u>फळसेवाडी हितकारी संस्था</u>

## कार्यकारीणी सभा

**दिनांक** : रविवार 02 सप्टेंबर 2018
**स्थळ** : 3/33, एसिक नगर, न्यु लिंक रोड, अंधेरी – पश्चिम, मुंबई – 400 053.

**उपस्थिती**

| | |
|---|---|
| 1. श्री मंगेश मनोहर राणे | 8. श्री भरत गणपत राणे |
| 2. श्री सुनिल सदानंद राणे | 9. श्री गुरुनाथ गणपत राणे |
| 3. श्री उदय भगवान राणे | 10. श्री सुनिल विनायक राणे |
| 4. श्री दशरथ दत्ताराम साटम | |
| 5. श्री पांडुरंग सावजी राणे – सभाध्यक्ष | |
| 6. श्री रंजन रावजी म्हसकर | |
| 7. श्री दिलीप मधुकर राणे | |

फळसेवाडी हितकारी संस्थेच्या कार्यकारीणीची सभा संस्थेचे सचिव श्री सुनिल सदानंद राणे यांच्या एसिक नगर, अंधेरी – पश्चिम, मुंबई येथील निवासस्थानी घेण्यात आली. सभेस कार्यकारीणीतील 10 सदस्य उपस्थित होते.

श्री सुनिल सदानंद राणे यांनी उपस्थितांचे स्वागत करुन त्यांच्या निवासस्थानी आजची सभा आयोजित करण्याची संधी दिल्याबद्दल सर्वांचे आभार मानले. संस्थेचे कार्याध्यक्ष श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी प्रयत्न करुन स्वयंपुर्ण पाणीपुरवठा योजना मार्गी लावल्याबद्दल सचिवांनी एसिक नगर रहिवासी कल्याणकारी संघातर्फे पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार केला.

संस्थेचे अध्यक्ष श्री मंगेश मनोहर राणे यांचे घरी आज श्री सत्यनारायण महापूजा असल्याकारणे त्यांनी सभेस उशीरा उपस्थित राहू असा निरोप दिला आहे व सभा सुरु करण्याची सूचना केली असल्याचे सांगून सचिवांनी आजची सभा संस्थेचे जेष्ठ सभासद आणि कार्यकारीणी सदस्य श्री पांडूरंग सावजी राणे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात यावी असा प्रस्ताव मांडला असता सर्व उपस्थितांनी सचिवांचा प्रस्ताव मंजूर केला.

श्री पांडूरंग सावजी राणे यांनी सभाध्यक्षस्थान स्विकारून सचिवांना सभा सुरु करण्याची सूचना केली. अध्यक्षांच्या परवानगीने सभा सुरु करण्यापूर्वी सचिवांनी आजच्या सभेच्या विषयपटलावरील विषयांचे वाचन उपस्थितापुढे केले आणि सभेस सुरवात केली.

**<u>विषय क्रमांक 1</u>**

सचिवांनी विषय क्रमांक 1 अंर्तगत दिनांक 23 जून 2018 रोजी घेण्यात आलेल्या सभेच्या इतिवृत्ताचे वाचन करुन उपस्थितांना इतिवृत्तामध्ये काही बदल / सुधारणा आवश्यक आहेत का ? अशी विचारणा केली. उपस्थितांकडून इतिवृत्तामध्ये काहीही बदल / सुधारणा न सुचविल्यामुळे दिनांक 23 जून 2018 रोजी झालेल्या कार्यकारीणी सभेचे इतिवृत्त सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

**<u>विषय क्रमांक 2</u>**

सचिवांनी उपस्थितांस माहीती दिली की वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक 11 ऑगष्ट 2018 रोजी घेण्यात आली होती, या सभेस एकूण 22 ग्रामस्थ / सभासद उपस्थित होते. वार्षिक सर्वसाधारण सभेने यावर्षी दोन नविन ग्रामस्थांची निवड करून त्यांस कार्यकारीणीवर पाठविले आहे. सचिवानी श्री गुरुनाथ गणपत राणे आणि श्री सुनिल विनायक राणे या नवनिर्वाचित कार्यकारीणी सदस्यांचे कार्यकारीणीवर स्वागत करुन त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडला. उपस्थितांनी श्री गुरुनाथ गणपत राणे आणि श्री सुनिल विनायक राणे यांचे हार्दिक अभिनंदन करून सचिवांनी मांडलेला अभिनंदनाचा ठराव मंजूर केला.

**<u>विषय क्रमांक 3</u>**

सचिवांनी उपस्थितांस सभासद नोंदणी अभियानासंबधी खालील माहीती दिली –

| | **सभासद नोंदणी** | | | **वार्षिक फी भरु इच्छिणारे सभासद** | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | **पुरुष** | **महिला** | **एकूण** | **पुरुष** | **महिला** | **एकूण** |
| 31 मार्च 2018 पर्यंत | 55 | 38 | 93 | 44 | 11 | 55 |
| 31 ऑगष्ट 2018 पर्यंत | 99 | 95 | 194 | 70 | 16 | 86 |
| **5 महिण्यास झालेली नोंदणी** | **44** | **57** | **101** | **26** | **5** | **31** |

सचिवांनी पुढे सांगितले की आर्थिक वर्ष 2018 – 19 च्या पहिल्या 5 महिण्यात संस्थेने एकूण 101 सदस्यत्वाचे फार्म भरुन घेतले असून ही प्रगती प्रशंसनीय आहे. दिनांक 31ऑगष्ट 2018 रोजी संस्थेची एकूण सभासदसंख्या 194 झालेली असून संस्थेने गेल्या वर्षभरात 151 नवीन सभासदांची नोंदणी करुन घेण्यात यश मिळविले आहे. सचिवांनी पुढे माहीती दिली की दिनांक 01 एप्रिल 2018 ते 31ऑगष्ट 2018 दरम्यान ज्या 101 नविन ग्रामस्थांनी संस्थेच्या सभासदत्वाचे फार्म भरुन दिले आहेत त्यांस संस्थेचे सभासद करुन घ्यावयाचे असून त्यास संस्थेचा सभासद करुन घेण्याचा तसेच त्यांस सभासद क्रमांक देण्याचा ठराव उपस्थितांपुढे मांडला असता उपस्थितांतर्फे तो मंजूर करण्यात आला.

दिनांक 01 एप्रिल 2018 ते 31 ऑगष्ट 2018 पर्यंत झालेल्या नविन सभासदांस संस्थेचा सभासद क्रमांक देण्याची जबाबदारी संस्थेचे सचिव श्री सुनिल सदानंद राणे आणि श्री दशरथ दत्ताराम साटम यांचेवर सोपविण्यात आली.

**<u>विषय क्रमांक 4</u>**

सचिवांनी उपस्थितांस माहीती दिली की कार्यकारीणी सदस्यांच्या पाठपुराव्यामुळे संस्थेने जरी 194 ग्रामस्थांकडून सभासदत्वाचे फार्म भरुन घेण्यात यश मिळविले असले तरी अजून फार मोठा पल्ला गाठावयाचा आहे. सचिवांनी त्यानंतर विभागवार माहीती देण्याची सूचना श्री दशरथ दत्ताराम साटम यांस केली. श्री साटम यांनी ज्या ग्रामस्थांपर्यंत अद्यापही कार्यकारीणी सदस्य पोहोचलेले नाहीत त्यांची खालीलप्रमाणे माहीती उपस्थितांपुढे सादर केली –

| **अनु क्र** | **ग्रामस्थाचे / कुटुंबप्रमुखाचे नाव** | **विभाग** |
|---|---|---|
| 1 | श्री विजय संभाजी राणे | दहिसर, बोरीवली |
| 2 | श्रीमती संध्या (तारामती) गोविंद भोगले | |

| अनु क्र | ग्रामस्थाचे / कुटुंबप्रमुखाचे नाव | विभाग |
|---|---|---|
| 1 | श्री सुरेश बाळकष्ण राणे | कांदिवली, मालाड |
| 2 | श्रीमती अश्विनी (शोभा) एकनाथ सावंत | |
| 1 | श्रीमती सुषमा सहदेव सावंत | गोरेगाव, जोगेश्वरी |
| 2 | श्रीमती सुनिता पांडूरंग सावंत | |
| 1 | श्रीमती शिल्पा प्रशांत सावंत | अंधेरी, साकीनाका, विलेपार्ले |
| 1 | श्री लवू शिवाजी राणे | परेल, ताड देव, वरळी, डिलाईल रोड, काळाचौकी |
| 2 | श्री किशोर महादेव राणे | |
| 3 | श्री चंद्रकान्त महादेव राणे | |
| 4 | श्रीमती शर्मिला गणपत सावंत | |
| 5 | श्री मनोहर भिकाजी राणे | |
| 6 | श्री संदिप मोहन राणे | |
| 7 | श्री प्रविण मधुकर राणे | |
| 1 | श्री शशिकांत वसंत राणे | घाटकोपर, कांजूरमार्ग, पवई, कुर्ला |
| 2 | श्री प्रकाश ज्ञानदेव राणे | |
| 1 | श्री संजय मनोहर राणे | भांडूप, मुलुंड |
| 1 | श्री नरेन्द्र अनंत राणे | ऐरोली, कोपरखैरणे, नेरुळ, वाशी |
| 2 | श्री मनोज भास्कर राणे | |
| 3 | श्री रुपेश वासुदेव म्हसकर | |
| 1 | श्री अनिल सदानंद राणे | भाईंदर, नायगाव, नालासोपारा, वसई, विरार |
| 2 | श्री एकनाथ अनंत राणे | |
| 3 | श्रीमती रुचिरा (पुष्पा) रविन्द्र मडव | |
| 4 | श्रीमती शुभांगी चंद्रकांन्त सावंत | |
| 5 | श्री जनार्दन सिताराम राणे | |
| 6 | श्रीमती शितल दत्तात्रय सावंत | |
| 7 | श्रीमती श्रध्दा (सुनंदा) चंद्रकान्त नलावडे | |
| 8 | श्री प्रकाश हरिश्चंद्र राणे | |
| 1 | श्री दत्ताराम मारुती राणे | दिवा, डोंबिवली, ठाणे |
| 2 | श्री सत्यवान गणपत सावंत | |
| 3 | श्री प्रविण अंकुश चव्हाण | |
| 4 | श्री प्रसाद वासुदेव म्हसकर | |
| 5 | श्री मंगेश काशिनाथ राणे | |
| 1 | श्री साबाजी विठोबा साटम | गावी |
| 2 | श्री अंकुश मारुती राणे | |
| 3 | श्री सुभाष नाना राणे | |
| 4 | श्री सचिन झिलू राणे | |

वरील माहीती देऊन श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी सांगितले की आपण मुख्यतो उत्तर-पश्चिम उपनगरे (भाईंदर, नायगाव, नालासोपारा, वसई, विरार) तसेच दक्षिण मध्य मुंबई (परेल, ताड देव, वरळी, डिलाईल रोड, काळाचौकी) या विभागांकडे लक्ष द्यावयास हवे. यावर श्री दिलीप मधुकर राणे यांनी तसेच श्री सुनिल विनायक राणे यांनी गणपतीउत्सवानंतर या विभागातील ग्रामस्थांची भेट घेऊन हे कार्य मार्गी लावण्याचा प्रयत्न केला जाईल असे सांगितले.

सचिवांनी सर्व उपस्थितांस सूचना केली की सर्व कार्यकारीणी सदस्यांनी सभासद नोंदणी अभियान 31 डिसेंबर 2018 पूर्वी पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**विषय क्रमांक 5**

सचिवांनी पाणीपुरवठा योजनेवार झालेल्या खर्चाबद्दल माहीती देण्याची सूचना श्री दशरथ दत्ताराम साटम यांस केली. श्री साटम यांनी उपस्थितांस सांगितले की पाणीपुरवठा योजनेअंर्तगत आजपर्यंत झालेला खर्च रु.5,33,245/- (रुपये पाच लाख तेहतीस हजार दोनशे पंचेचाळीस फक्त) इतका असून त्याची संक्षिप्त माहीती खालीलप्रमाणे आहे.

| | | **प्रथम अंदाज** | **सुधारित अंदाज** | **प्रत्यक्षात खर्च** |
|---|---|---|---|---|
| 1 | पाणीची टाकी / टाक्या ठेवण्यासाठी २० फूट उंचीचे कॉक्रीट स्ट्रक्चर उभे करणे | 180,000 | 190,000 | 210,000 |
| 2 | कॉक्रीट स्ट्रक्चरवर प्रत्येकी ५,००० लिटर पाणी साठविण्याची क्षमता असलेल्या दोन सिन्टेक्सच्या टाक्या बसविणे | 70,000 | 60,000 | 80,240 |
| 3 | पाण्याच्या स्त्रोतापासून पाण्याच्या टाक्यांपर्यत तसेच पाण्याच्या टाक्यांपासून ग्रामस्थांच्या घरापर्यंत पाईपलाईन व्यवस्था उभारणे | 150,000 | 150,000 | 243,005 |
| 4 | पाणी उपसा करण्यासाठी पंप, केबल, कंन्ट्रोल, स्टार्टर, फिटींग्स इत्यादि मजूरी सहीत | 154,400 | 100,000 | |
| | **एकूण खर्च** | **554,400** | **500,000** | **533,245** |

**खर्चाचा तपशील**

| **क्र** | **खर्चाचा प्रकार** | **रक्कम** |
|---|---|---|
| 1 | टाकीच्या स्ट्रक्चरच्या बांधकामाचा खर्च (कंत्राटदार – मालवणकर) | 210,000.00 |
| 2 | **मुंबईहून पाठविलेले सामान** | |
| | 2 सिन्टेक्स पाण्याच्या टाक्या | 80,240.00 |
| | पाईप्स | 37,313.00 |
| | केबल | 14,691.00 |
| 3 | **गावी घेतलेले सामान** | |
| | 2 किर्लोस्कर पंप | 39,800.00 |
| | पाईपलाइनसाठी लागणाऱ्या इतर फिटिंग्स | 33,119.00 |
| | पंपासाठी लागणारे इलेक्ट्रिकल सामान | 11,000.00 |
| | लहान मोठे पाईप्स / जॉइन्ट | 1,592.00 |

| क्र | खर्चाचा प्रकार | रक्कम |
|---|---|---|
| 4 | चरी खोदण्यासाठी कामगारांना मजुरी | 46,000.00 |
| 5 | पाईपलाईन टाकण्यासाठी कंत्राटदारांना दिले (कंत्राटदार – महाडेश्वर) | 30,500.00 |
| 6 | गावी करण्यात आलेला इतर खर्च | 28,990.00 |
| | **एकूण खर्च** | **533,245.00** |

श्री दशरथ साटम यांनी पुढे सांगितले की पाणीपुरवठा योजनेवर झालेला खर्च हा अंदाजित खर्चापेक्षा जास्त आहे कारण प्रथम आपण कुपनलिका (बोअरवेल) खोदून पाणीपुरवठा योजना राबविण्याचा विचार करुन खर्चाचा अंदाज काढला होता. परंतू कुपनलिकेसाठी पुरेसा पाणीसाठा न मिळाल्यामुळे आपण ब्राह्मण विहीर तसेच साटमांची विहीर या दोन्ही विहीरींमध्ये सबमर्सिबल पंप टाकून पाणीपुरवठा योजना कार्यान्वित केली. या दोन ठिकाणी पंप टाकावयास लागल्यामुळे तसेच दोन्ही ठिकाणी वायरींग आणि या ठिकाणाहून पाण्याच्या पाईपलाईन पाण्याच्या टाक्यांपर्यत टाकावयास लागल्यामुळे एकूण खर्च वाढला आहे.

श्री साटम यांनी पुढे माहीती दिली की सध्या श्री सुनिल सदानंद राणे यांच्या घरातून वीजपुरवठा घेऊन साटमांच्या विहीरीतून पाणी उपसा केला जात आहे तसेच श्री अंकुश मारुती राणे यांच्या घरातून वीजपुरवठा घेऊन ब्राह्मण विहीरीतून पाणी उपसा केला जात आहे. या दोन्ही वीजजोडण्यामधुन वापरण्यात येणाऱ्या वीजेचे बिल भरण्याची जबाबदारी संस्थेची असून संस्थेच्या नावावर मीटर मिळेपर्यंत या दोन्ही वीज जोडण्यांची मासिक बिले संस्थेने भरावयास हवीत. या संर्दभात श्री साटम यांनी पुढे माहीती दिली की या दोन्ही वीज जोडण्या मुख्यतो (1) श्री यशवंत बाळकृष्ण राणे [ग्राहक क्रमांक 230610003716] आणि (2) श्री अंकुश मारुती राणे [ग्राहक क्रमांक 230610003392] यांच्या नावावर असल्यामुळे या दोन्ही वीज जोडण्यांवरील मागील 12 महिण्याच्या वीजवापराचा पडताळा करण्यात आला असून मागिल वर्षभरातील वीजवापर / वीजबिल गृहित धरल्यास श्री यशवंत बाळकृष्ण राणे यांचे मासिक सरासरी बिल रु.90/- आणि श्री अंकुश मारुती राणे यांचे मासिक सरासरी बिल रु.425/- येत आहे. आता पंपासाठी लागणारी वीज यांच्या मीटरमधून घेण्यात आली असल्यामुळे या सरासरी रक्कमेवरील वीजबिलाचा भार संस्थेने उचलावयास हवा. त्यानुसार यापुढील वीजबिलांच्या बिलाची रक्कम पाहून त्याच्या सरासरीपेक्षा जास्तीची रक्कम या ग्रामस्थांस पाठवयास हवी. या प्रस्तावास उपस्थितांनी मान्यता दिली.

श्री साटम यांनी पुढे सांगितले की आतापर्यंत झालेल्या खर्चाची उभारणी व्हावी यासाठी प्रत्येक नळजोडणीवर आकारणी करण्याचे प्रयोजन असून पुढील 2 ते 3 महीन्यानंतर शक्यतो डिसेंबर 2018 नंतर पाणीपुरवठ्यासाठी होणाऱ्या मासिक वीजखर्चाचा अंदाज आल्यानंतर नळजोडणी आकारणी व वार्षिक पाणीपट्टी याबाबत अंदाज घेण्यात येईल तसेच याकाळात पाणीवापरासाठी नियमावली तयार करण्यात येईल आणि ज्या ग्रामस्थास नियमावली मान्य असेल त्यास फळसेवाडी स्वयंपूर्ण पाणीपुरवठा योजने अंर्तगत पाणीपुरवठा करण्यात येईल. श्री साटम यांनी मांडलेल्या या प्रस्तावास उपस्थितांनी अनुमोदन दिले.

श्री साटम यांनी पुढे सांगितले की पाणीपूरवठा योजना पुर्णत्वास नेण्यासाठी खालील कामे करणे आवश्यक आहे –

1. पाण्याच्या टाकीपासून ग्रामस्थांच्या घरापर्यंत पाणी पोहचविण्यासाठी दुसऱ्या (अतिरिक्त) पाईपलाईनची व्यवस्था करावयाची आहे (हे काम शक्यतो डिसेंबर 2018 नंतर हाती घेण्यात येईल)

2. पैलाडहून येणारे पाणी पाण्याच्या टाकीपर्यंत पोहचविण्यासाठी पाईपलाईनची व्यवस्था करावयाची आहे.

3. डोहाची चिंच येथे 25 फुट घेराची विहीर खोदण्याचे प्रयोजन असून निधीची उपलब्धता झाल्यास पुढील वर्षाच्या एप्रिल / मे महिण्यात काम हाती घेण्यात येईल.

4. डोहाच्या चिंचेजवळ विहीरीचे काम झाल्यानंतर ती विहीर ते पैलाडहून येणारी पाईपलाईन यास जोडणारी पाईपलाईनची व्यवस्था करावयाची आहे.

5. डोहाची चिंच येथे बांधण्यात येणाऱ्या विहीरीवर पाणी उपसा करण्यासाठी पंप, केबल, कंन्ट्रोल, स्टार्टर, फिटिंग्स इत्यांदींची व्यवस्था करावयाची आहे.

6. पाण्याच्या टाकीपर्यंत थ्री फेज विजपुरवठा आणण्याचा विचार असून येथून तिन्ही ठिकाणचे (ब्राम्हणविहीर, डोहाच्या चिंचेजवळील विहीर आणि साटमांची विहीर) पंप चालू करता येतील.

7. पाण्याच्या टाकीच्या खाली मीटर रुम बांधावयाचा विचार आहे.

यानंतर श्री सुनिल सदानंद राणे आणि श्री उदय भगवान राणे यांनी झालेल्या खर्चाचा काही अंशी भार उचलावा या उद्धेशाने मागिल वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये (दिनाकं 15 एप्रिल 2017 रोजी झालेल्या) ठरविल्यानुसार रु.16,000/- चा धनादेश संस्थेकडे सुपुर्द केला असता श्री साटम यांनी पुढील 3 महिण्यानंतर / डिसेंबर 2018 नंतर एकूण खर्चाचा अंदाज तसेच विजपुरवठ्यासाठी होणारा मासिक खर्च विचारात घेऊन घरामागे / नळजोडणीमागे काढावयाची एकूण रक्कम ठरविण्यात येईल व त्यानुसार आपण दिलेली रु.16,000/- ही रक्कम वळती करुन घेण्यात येईल असे सांगितले.

**<u>विषय क्रमांक 6</u>**

सचिवांनी उपस्थितांस सांगितले की स्वयंपूर्ण पाणीपुरवठा योजना जरी दिनांक 10 ऑगष्ट 2018 पासून अनौपचारिक रित्या कार्यान्वित करण्यात आलेली असली तरी तीचे औपचारिक उद्‌घाटन करावयास हवे. औपचारिक उद्‌घाटन करतेवेळी वाडीतील सुहासिनींच्या हातून सध्या नळयोजनेसाठी पाणीपुरवठा करणाऱ्या दोन्ही विहीरींचे पुजन तसेच पाण्याची साठवुणूक होणाऱ्या पाण्याच्या टाकीचे पुजन करावयास हवे व याबाबीचे आयोजन श्री गणपतीउत्सवादरम्याण केल्यास सर्व ग्रामस्थ उपस्थित असतील त्यामुळे या औपचारिक उद्‌घाटणाची तारीख ठरवावयास हवी. आपल्या विभागातील आमदार माननिय श्री नितेश नारायणरावजी राणे यांस निमंत्रण देऊन उद्‌घाटणास बोलवायचे का ? याबद्दल चर्चा करण्यात आली असता ही सर्व जबाबदारी स्थानिक ग्रामस्थ श्री रत्नाकर नाना राणे आणि श्री अंकुश मारुती राणे यांच्यावर सोपविण्याचे ठरविण्यात आले. तसेच ग्रामस्थांची सभा घेऊन कार्यक्रमाची आखणी करावी आणि आमदार, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य व इतर मान्यवर व्यक्तींस निमंत्रण द्यावे अशी सूचना करण्यात आली.

**<u>विषय क्रमांक 7</u>**

वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये ठरविण्यात आल्यानुसार पुढील 6 वर्षांमध्ये क्रमाक्रमाने निवृत्त होणाऱ्या कार्यकारीणी सदस्याच्या नावांबद्दल चर्चा करण्यात आली. सर्वानुमते खालील प्रकारे कार्यकारीणी सदस्य निवृत्त होतील असे ठरविण्यात आले.

| वर्ष | निवृत्त होणारे कार्यकारीणी सदस्य | नविन सदस्यांची निवड | कार्यकारीणीची संख्या |
|---|---|---|---|
| 2019 – 20 | श्री जयवंत नाना राणे<br>श्री उत्तम वामन राणे | 1 | 17 |
| 2020 – 21 | श्री पांडूरंग सावजी राणे<br>श्री अशोक दत्ताराम राणे | 1 | 16 |
| 2021 – 22 | श्री शंकर बाळकृष्ण राणे<br>श्री भरत गणपत राणे<br>श्री उदय भगवान राणे | 2 | 15 |
| 2022 – 23 | श्री दशरथ दत्ताराम साटम<br>श्री रंजन रावजी म्हसकर<br>श्री मंगेश मनोहर राणे<br>श्री रामदास मारुती राणे | 3 | 14 |
| 2023 – 24 | श्री दिलीप मधुकर राणे<br>श्री सुनिल सदानंद राणे<br>श्री हेमंतकुमार रमेश राणे<br>सौ अनुजा अरुण राणे | 3 | 13 |
| 2024 – 25 | श्री गुरुनाथ गणपत राणे<br>श्री सुनिल विनायक राणे<br>श्री संकेत रत्नाकर राणे | 2 | 12 |

यापुढील प्रत्येक वर्षी दोन सभासद निवृत्त होतील व सभासदांचा कार्यकाल 6 वर्षांचा राहील.

निवृत्त होणारे कार्यकारीणी सदस्य पुर्न:निवडीस पात्र राहतील आणि पुढील 6 वर्षांनंतर कार्यकारीणी सदस्यांची संख्या 12 पर्यंत मर्यादित करण्यात येईल. वरील बाबींस उपस्थितांतर्फे मान्यता देण्यात आली.

**<u>विषय क्रमांक 8</u>**

अध्यक्ष, सचिव आणि खजिनदार यांस सहाय्य व्हावे तसेच इतर कार्यकारीणी सदस्यांस संस्थेच्या कामकाजाचा अनुभव व्हावा या उध्देशाने कार्यकारीणीवर उपाध्यक्ष, उपसचिव आणि उपखजिनदार यांची निवड करणे आवश्यक असल्याची माहीती सचिवांनी देऊन ही जबाबदारी उचलण्यासाठी इच्छूकांना विचारणा केली असता उपस्थितांतर्फे कोणीही स्वत:हून पुढाकार न घेतल्यामुळे सर्वांनी चर्चा करुन श्री रंजन रावजी म्हसकर, श्री दिलीप मधुकर राणे आणि श्री हेमंतकुमार रमेश राणे यांची नावे अनुक्रमे उपाध्यक्ष, उपसचिव आणि उपखजिनदार या पदांसाठी सुचविण्यात आली. याबाबत पुन:चर्चा करण्यात येऊन पुढील 3 वर्षाच्या कालावधीसाठी श्री रंजन रावजी म्हसकर (उपाध्यक्ष), श्री दिलीप मधुकर राणे (उपसचिव) आणि श्री हेमंतकुमार रमेश राणे (उपखजिनदार) यांची निवड उपाध्यक्ष, उपसचिव आणि उपखजिनदार या पदांवर करण्यात आली.

**<u>विषय क्रमांक 9</u>**

श्री लिंगेश्वर देवालयाच्या जिर्णोध्दारासंबधी पिसेकामते विकास मंडळाने दिलेल्या पावतीपुस्तकांसंबधी आढावा घेण्यात आला असता सभेदरम्याण कोणाही सदस्यांने पावतीपुस्तकांचा भराणा न केल्यामुळे त्यास लवकरात लवकर

पावतीपुस्तकांचा भराणा करण्याची सूचना करण्यात आली. सचिवांकडून आजपर्यंत भराणा करण्यात आलेल्या पावतीपुस्तकांची खालील नोंद घेण्यात आली.

| क्र | नाव | पुस्तक क्र | पावती क्र | | जमा रक्कम | तारीख |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | श्री उदय भगवान राणे | 161 | 4001 | 4025 | | |
| 2 | श्री गंगाराम महादेव राणे | 164 | 4076 | 4100 | | |
| 3 | श्री शंकर बाळकृष्ण राणे | 166 | 4126 | 4150 | | |
| 4 | श्री रंजन रावजी म्हसकर | 167 | 4151 | 4175 | | |
| 5 | श्री संतोष मधुसुदन राणे | 168 | 4176 | 4200 | | |
| 6 | श्री सुनिल विनायक राणे | 169 | 4201 | 4225 | | |
| 7 | श्री दिलीप मधुकर राणे | 170 | 4226 | 4250 | | |
| 8 | श्री अशोक दत्ताराम राणे | 171 | 4251 | 4275 | | |
| 9 | श्री मंगेश मनोहर राणे | 172 | 4276 | 4300 | | |
| 10 | श्री रोहन जयंत सावंत | 173 | 4301 | 4325 | 2500.00 | 23-06-2018 |
| 11 | श्री हेमंतकुमार रमेश राणे | 174 | 4326 | 4350 | | |
| 12 | श्री सुनिल सदानंद राणे | 175 | 4351 | 4375 | 2625.00 | 15-09-2018 |
| 13 | श्री उत्तम वामन राणे | 176 | 4376 | 4400 | | |
| 14 | श्री भरत गणपत राणे | 177 | 4401 | 4425 | 2518.00 | 23-06-2018 |
| 15 | श्री गुरुनाथ गणपत राणे | 178 | 4426 | 4450 | 2500.00 | 23-06-2018 |
| 16 | श्री गुरुनाथ गणपत राणे | 179 | 4451 | 4475 | 2700.00 | 23-06-2018 |
| 17 | श्री भास्कर दौलत राणे | 180 | 4476 | 4500 | | |
| | **एकूण जमा** | | | | **12843.00** | |

सचिवांतर्फे माहिती देण्यात आली की दसऱ्यादिवशी भूमिपूजन समारंभ आयोजित करण्यात येत असून बांधकामास सुरवात होईल त्यामुळे ज्यांचेकडे पावतीपुस्तके देण्यात आली आहेत त्यांनी लवकरात लवकर पावतीपुस्तकांचा भराणा करण्याची काळजी घ्यावी जेणेकरुन जिर्णोध्दाराच्या बांधकामासाठी रक्कम उपलब्ध होईल.

**<u>विषय क्रमांक 10</u>**

सचिवांनी उपस्थितांना माहीती दिली की गेल्या कार्यकारीणीच्या सभेनंतर कोणत्याही सभासदाकडून अथवा ग्रामस्थाकडून संस्थेकडे पत्रव्यवहार झालेला नाही.

**<u>विषय क्रमांक 11</u>**

उपस्थित सभासदांकडून / आमंत्रिता कडून कोणत्याही नवीन योजना मांडण्यात आल्या नाहीत.

**<u>इतर विषय</u>**

**इतर विषयांअंर्तगत**

1. सचिव श्री सुनिल सदानंद राणे यांनी सूचना केली की दरवर्षी श्री रत्नाकर नाना राणे हे गणपती विसर्जनावेळी गोठणावर गाऱ्हाणे घालून ग्रामस्थांचा पाण्याचा प्रश्न मार्गी लाव अशी मागणी देवाकडे करत असतात. श्री गणेशाच्या कृपेने आणि आपण सर्वांच्या प्रयत्नांने यावर्षी पाण्याच्या प्रश्न काही अंशी मार्गी लागला असल्यामुळे

गणेश विर्सजनादिवशी गोठणावर श्रीफळ वाढूवून ग्रामस्थांचे इतरही प्रश्न मार्गी लावून एकदिलाने आणि एकमताने संपूर्ण वाडीचा विकास होऊ दे असे मागणे गणरायाकडे करावे अशी सूचना केली.

2. श्री लिंगेश्वर देवालयाचा खांब पुरस्कृत करण्यासाठी वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये ठरविल्यानुसार देणगी काढण्याचा ठराव पास करण्यात आलेला असून कार्यकारीणी सदस्यांनी त्यांच्या विभागातील ग्रामस्थांच्या घरोघरी जाऊन प्रती कुटुंब रु.500/- ही रक्कम लवकरात लवकर जमा करावी. सभेदिवशी खालील ग्रामस्थांकडून श्री लिंगेश्वर देवालयाचा खांब पुरस्कृत करण्यासाठी रु.500/- देणगी जमा झाली.

| **क्रमांक** | **देणगीदाराचे नाव** | **जमा रक्कम** |
|---|---|---|
| 1 | श्री रंजन रावजी म्हसकर | 500.00 |
| 2 | श्री मंगेश मनोहर राणे | 500.00 |
| 3 | श्री गुरुनाथ गणपत राणे | 500.00 |
| 4 | श्री भरत गणपत राणे | 500.00 |
| 5 | श्री सुनिल विनायक राणे | 500.00 |
| 6 | श्री दिलीप मधुकर राणे | 500.00 |
| 7 | श्री प्रविण मधुकर राणे | 500.00 |
| 8 | श्री यशवंत बाळकृष्ण राणे | 500.00 |
| 9 | श्री अविनाश बाळकृष्ण राणे | 500.00 |
| 10 | श्री सुरेश बाळकृष्ण राणे | 500.00 |
| 11 | श्री उदय भगवान राणे | 500.00 |
| 12 | श्री सुनिल सदानंद राणे | 500.00 |
| 13 | श्री उत्तम वामन राणे | 500.00 |
| 14 | श्री संतोष मधुसुदन राणे | 500.00 |
| 15 | श्री श्रीकांत प्रभाकर राणे | 500.00 |
| | **एकूण जमा रक्कम** | **7500.00** |

3. मध्य मुंबई, पश्चिम उपनगर, पूर्व उपनगर आणि नवी मुंबई येथे वास्तव्यास असलेल्या कार्यकारीणी सदस्यांच्या घरी वर्षातून एकदा तरी कार्यकारीणी सभा घेण्यात यावी असा विचार श्री दशरथ दत्ताराम साटम यांनी मांडला असता सर्व उपस्थितांनी या विचारास अनुमोदन दिले. यापुढील सभा श्री पांडूरंग सावजी राणे यांचे भांडूप येथील निवासस्थानी घ्यावी का ? अशी विचारणा त्यांस केली असता त्यांनी त्यांच्या मुलासोबत चर्चा करून नक्की करतो असे सांगितले.

त्यानंतर सचिवांनी उपस्थितांचे आभार मानले व अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

---

श्री सुनिल सदानंद राणे
सचिव

श्री मंगेश मनोहर राणे
अध्यक्ष